* सरव्या * (22) सरव्या 2005 पान 33 B४८

सोसाट्याच्या वाऱ्यासवे
आली आषाढाची सर
किती भाव नवथर
गेले भिजवून उर

किती पान पालवीने
माझी फुलविली काया
याच रानसावलीत
ओथंबली तुझी माया.

काळ्याकुट्ट ढगांखाली
गुज वळचणीशी केले
तुझ्या माझ्या लईतून
एक गीत उच्छ्वासले

असे अवेळाचे लेणे
घेऊनिया अंगणीत
नित्य आषाढ सजतो
सरव्या तुझ्या सोबतीत.

१४।०२।२००९
१४।२।०५

सहदेव मखामळे.